निवेदन

भूमिका

# निवेदन

गेल्या पंधराअेक वर्षांत महाराष्ट्रात स्त्रीजीवनविषयक अभ्यासाला विशेषत्वाने आरंभ झालेला आहे. या विषयासंबंधीची व्याख्याने, चर्चा, परिसंवाद यांचे प्रमाणही बरेच वाढले आहे. 'स्त्री-पुरुष विषमता' या विषयावरील अशाच अेका चर्चेच्या निमित्ताने स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याकडे माझे लक्ष गेले आणि कालांतराने स्त्रियांच्या अनेक आत्मचरित्रांचे वाचन घडले. या वाचनाचीच परिणती 'मराठीतील स्त्रियांची आत्मचरित्रे' हा विषय प्रबंधासाठी निवडण्यात झाली आणि त्यामुळे प्रस्तुत विषयाचा चिकित्सापूर्वक अभ्यास होअू शकला.

पीअेच्.डी.च्या संशोधनासाठी सर्वात महत्त्वाची आवश्यकता असते ती संदर्भग्रंथांची. त्या दृष्टीने आमच्या श्री. ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठाच्या पुणे शाखा ग्रंथालयाच्या ग्रंथपाल श्रीमती नलिनी करंदीकर व त्यांच्या सहकारी श्रीमती प्रसन्ना यांचे मोलाचे साहाय्य झाले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे विश्रामबागवाडा येथील ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे यांचे ग्रंथालय, मातृस्मृती ग्रंथालय,पुणे; गरवारे महाविद्यालयाचे ग्रंथालय, भारतीय चित्रपट संस्था, पुणे; यांचे ग्रंथालय यांचे अपरंपार साहाय्य झाले. या सर्वांच्या साहाय्यावाचून माझे प्रबंधलेखन होअू शकले नसते याची मला जाणीव आहे.

श्री.ना.दा.ठाकरसी मानव्य आणि वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.हेमंत अिनामदार यांनी प्रस्तुत प्रबंधलेखनास विशेष प्रोत्साहन दिले.

या प्रबंधलेखनास आरंभापासून अखेरपर्यंत माझे मार्गदर्शक डॉ.विलास खोले यांनी जे मार्गदर्शन केले ते माझ्या कायम स्मरणात राहील. त्यांच्या मार्गदर्शनावाचून हे प्रबंधलेखन पुरे होअू शकले नसते याची मला जाणीव आहे.

त्यांच्या अभ्यासपद्धतीतील वैचारिक सुस्पष्टता आणि गुणवत्तेविषयीचा आग्रह यांचा प्रत्यय माझ्या अभ्यासाच्या कालावधीत मला सतत येत राहिला. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता शब्दात व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहाणेच मला आवडेल.

गेल्या चार वर्षांच्या कालावधीत माझे पती श्री. सुभाष गोखले यांनी मला अभ्यासासाठी व प्रबंधलेखनासाठी बरेच उत्तेजन दिले. तसेच माझी आजी सौ. शालिनी सहस्रबुद्धे हिने मला प्रबंधपूर्तीसाठी निरनिराळ्या प्रकारे बहुमोल मदत केली. या दोघांच्या साहाय्याचा निर्देश करणे मला माझे कर्तव्य वाटते.

श्री. विलास सहस्रबुद्धे यांनी या प्रबंधाचे टंकलेखन अतिशय काळजी-पूर्वक व नेटकेपणाने केले याबद्दल मी त्यांची मनापासून आभारी आहे.

१२१२ ब ऐरंडवणा,
पुणे ४११ ००४

उज्ज्वला गोखले

टीप : टंकलेखनाच्या काही अंगभूत मर्यादांमुळे प्रबंधात काही टंकमुद्रणदोष अपरिहार्यपणे राहून गेले आहेत याची प्रबंध सादर करताना खेदपूर्वक नोंद करावीशी वाटते.

. . . . . . . . . . .